गोमन्तक

पणजी, रविवार, १९ डिसेंबर २०२१



# गोवा शिपयार्ड लिमिटेड

सीआयएन : U63032GA1967GOI000077
रजि. कार्यालय : वाडे, वास्को द गामा, गोवा ४०३ ८०२,
ई मेल : contactus@goashipyard.com वेबसाईट : www.goashipyard.in

क्रिसिल क्रेडिट रेटिंग
लाँग - टर्म "एएए"
शॉर्ट - टर्म "ए१+"

## वित्तीय वर्ष २०२१-२२ करिता अंतरिम लाभांशाच्या प्रदानाकरिता रेकॉर्ड तारखेची सूचना

या कंपनीच्या संचालक मंडळाद्वारे १७ डिसेंबर २०२१ रोजी झालेल्या त्यांच्या ०८/२०२१ बैठकीत या कंपनीच्या भरणा झालेल्या भागभांडवलाच्या ६५% च्या बरोबरीने, प्रती समभाग रु. ५.०० च्या रु. ३.२५ दराने वित्तीय वर्ष २०२१-२२ करिता अंतरिम लाभांश जाहीर करण्यात आला.

या संबंधात कंपनी अधिनियम २०१३ च्या उपबंधांनुसार एतद्वारा सूचना देण्यात येते की वित्तीय वर्ष २०२१-२२ करिता अंतरिम लाभांशाच्या प्रदानाकरिता भागधारकांचे हक्क सुनिश्चित करण्यासाठी **सोमवार, २७ डिसेंबर २०२१** ला **रेकॉर्ड तारीख** म्हणून निश्चित करण्यात आली आहे. ज्या भागधारकांची नावे (अ) इलेक्ट्रॉनिक फॉर्ममध्ये धारण केलेल्या भागांच्या बाबतीत डिपॉझिटरीद्वारे प्रस्तुत करण्यात येणाऱ्या लाभाधिकारी स्वामींच्या यादीमध्ये लाभाधिकारी स्वामी म्हणून; आणि (ब) **सोमवार, २७ डिसेंबर २०२१** ला कामकाज बंद होण्याच्या वेळेनुसार या कंपनीच्या सदस्यांच्या रजिस्टरमध्ये सदस्य म्हणून नोंद झाली आहे ते उक्त अंतरिम लाभांशाचे हक्कदार राहतील.

वित्त अधिनियम २०२० द्वारे सुधारित आयकर अधिनियम १९६१, (''आयटी कायदा'')च्या तरतुदींनुसार, कंपनीद्वारे प्रदान किंवा वितरित करण्यात येणारा लाभांश भागधारकांच्या हातांमध्ये करपात्र राहील. म्हणून लाभांशाचे प्रदान करतेवेळी, कंपनीने लाभांशाच्या रकमेवर आयकर अधिनियमामध्ये निर्धारित करण्यात आलेल्या दरांनुसार, स्त्रोतावर कर कापून घेणे आवश्यक आहे. पुढे, आयटी कायद्याच्या कलम २०६एबी च्या तरतुदींनुसार (१ जुलै, २०२१ पासून प्रभावी), आयटी कायद्यामध्ये परिभाषित केल्यानुसार 'निर्दिष्ट व्यक्तींना' देय दिल्यास उच्च दराने कर कपात करणे आवश्यक आहे.

कंपनीला योग्य दराने कर कपात करण्यास सक्षम करण्यासाठी भागधारकांना विनंती करण्यात येते की त्यांनी जर भाग अमूर्त स्वरूपात धारण केले असतील तर आपल्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स (डीपी) कडे उक्त रेकॉर्ड तारखेला किंवा त्यापूर्वी आपली रहिवासाची स्थिती आणि पॅनचे विवरण नोंदवावे/अद्ययावत करावे. जर समभाग डिमटेरिअलाइज्ड फॉर्ममध्ये असतील आणि वास्तविक स्वरूपात असलेल्या शेअर्सच्या संदर्भात वरील तपशील कंपनीकडे तिच्या नोंदणीकृत कार्यालयात किंवा कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट (आरअँडटीए) अर्थात पूर्वा शेरेजिस्ट्री इंडिया प्रा. लि., युनिट नं. ९, तळ मजला, शिव शक्ती इंड. इस्टेट, जे. आर. बोरीचा मार्ग, लोअर परेल इस्ट, मुंबई, महाराष्ट्र - ४०० ०११ यांचेकडे पाठवावा लागेल. कोणताही सदस्य, ज्याला टीडीएस सवलतीवर दावा करावयाचा आहे तो कंपनीकडे किंवा आरअँडटीए कडे फॉर्म १५जी/१५एच वरील रेकॉर्ड तारखेला किंवा त्यापूर्वी सादर करू शकतो आणि त्यानुसार टीडीएस सवलतीवर विचार करण्यात येईल.

ज्या सदस्यांनी आपले ई-मेल पत्ते आणि आदेश (मँडेट)चे तपशील नोंदणीकृत केलेले नाहीत त्यांनी कृपया कंपनीकडे/आरअँडटीएकडे नोंदणी करावी, जर शेअर्स वास्तविक स्वरूपात किंवा संबंधित डीपीकडे असतील, जर शेअर्स इलेक्ट्रॉनिक पद्धतीमध्ये घेतले असतील तर दस्तऐवज पाठविणे आणि इलेक्ट्रॉनिक पद्धतीच्या माध्यमातून लाभांश देण्याकरिता कंपनीला शक्य होईल.

उक्त सूचना कंपनीची वेबसाइट www.goashipyard.in वर सुद्धा उपलब्ध आहे.

स्थानः वास्को द गामा, गोवा
दिनांकः १८.१२.२०२१

गोवा शिपयार्ड लिमिटेड करिता
स्वा./-
**(छाया जैन)**
कंपनी सचिव